महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य
छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे
सारथी मुख्यालय, सीटी सर्वे नंबर १७३, बी/१, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४
Email ID : sarthipune@gmail.com | CIN - U74999PN2018NPL177394 | Website : www.sarthi-maharashtragov.in | 020-25592502

अधिसूचना क्रमांक: सारथी/स्पर्धा परीक्षा विभाग/UPSC/मुलाखत २०२५ प्रायोजकत्व/

# मार्गदर्शक सूचना

## संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२६ उत्तीर्ण लक्षित गटातील विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेकरिता सारथी मार्फत एकरकमी आर्थिक साहाय्य प्रायोजकत्व

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी प्रवर्गातील संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२६ (दि.२६/२/२०२६ रोजी संघ लोकसेवा आयोगामार्फत प्रसिद्ध निकालानुसार) उत्तीर्ण उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारीकरिता सारथी मार्फत एकरकमी आर्थिक प्रायोजकत्व करिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

- ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख : दि.२२/४/२०२६
- ऑनलाईन अर्ज व अपलोड केलेल्या कागदपत्रे स्वयं साक्षांकित प्रत (हार्ड कॉपी) सारथी विभागीय कार्यालय अमरावती येथे पाठविण्याची शेवटची तारीख : दि.२४/४/२०२६
- छायांकित प्रत (हार्ड कॉपी) पाठविण्याकरिता पत्ता : अमरावती विश्रामगृहालगत, कॅम्प रोड, चपराशीपुरा, जुनी भातकुली तहसिल अमरावती, ता. जि. अमरावती – ४४४६०२
- अर्ज करण्यापूर्वी सर्व अर्जदारांनी www.mahasarathi.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट देऊन स्वत:चा 'महाआयडी' तयार करून घ्यावा.अर्ज करण्यासाठी महाआयडी नोंदविणे आवश्यक राहील.

- अर्ज करण्यासाठी सारथी, पुणे संस्थेच्या https://sarthi.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावरील सूचना फलकमधील "संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२६ प्रायोजकत्व" या लिंकवर सदर 'मार्गदर्शक सूचना' वाचून ऑनलाईन अर्ज विहित मुदतीत भरावा. ऑनलाईन अर्जात सुस्पष्ट व सर्व स्वयं साक्षांकित कागदपत्रे व्यवस्थित स्कॅनकरून अपलोड करावीत. तसेच ऑनलाईन अर्जामध्ये भरलेल्या सर्व कागदपत्रांची स्वयं साक्षांकित प्रत (अधिसूचना मुद्दा क - क्र.५ मध्ये दिलेल्या क्रमाने) तसेच ईमेलवर प्राप्त ऑनलाईन अर्जाची प्रत सारथी विभागीय कार्यालय अमरावती (अमरावती विश्रामगृहालगत, कॅम्प रोड, चपराशीपुरा, जुनी भातकुली तहसिल अमरावती, ता. जि. अमरावती – ४४४६०२) येथे पाठविण्याची अंतिम मुदत दि.२४/४/२०२६ आहे.

*अ] संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२६ तयारीकरिता आर्थिक प्रायोजकत्व लाभाचे स्वरुप :*

लाभाचे स्वरुप : संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२६ तयारीकरिता उमेदवाराला एकरकमी आर्थिक प्रायोजकत्व रु.५०,०००/- फक्त

*ब] पात्रता :*

१) दि.२६/२/२०२६ रोजी संघ लोकसेवा आयोगामार्फत प्रसिद्ध निकालानुसार भारतीय अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२६ उमेदवार उत्तीर्ण असावा.
२) उमेदवार हा महाराष्ट्रातील अधिवासी तसेच मराठा, कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी या सारथी लक्षित गटातील असावा.
३) उमेदवाराला नॉन-क्रीमीलेयर श्रेणीमध्ये असणे आवश्यक आहे.
४) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.आठ लाखापेक्षा कमी असावे.

*क] प्रायोजकत्वासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया :*

१. सारथी संस्थेच्या https://sarthi.maharashtra.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या " संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२६ प्रायोजकत्व" संबंधित अधिसूचनेतील मागदर्शक व महत्त्वाच्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
२. मागदर्शक सूचना वाचल्यानंतरच ऑनलाईन अर्ज भरावा, अर्ज पूर्ण भरल्यानंतर तुम्ही भरलेली माहिती अचूक असल्याची व अपलोड केलेले कागदपत्रे योग्य व स्पष्ट असल्याची खात्री करावी, तद्नंतरच ऑनलाईन अर्ज दाखल करावा.
३. अर्ज दाखल केल्यानंतर, अर्ज डाउनलोड करावा (किंवा अर्ज दाखल केल्यानंतर तुम्हाला ईमेलवर मिळणारा प्रतिसाद), त्याची एक झेरॉक्स प्रत काढून त्यावर स्वाक्षरी करावी.
४. वेबसाइटवरून चेकलिस्ट डाउनलोड करावी, चेकलिस्ट मध्ये संपूर्ण तपशील भरावा आणि त्यावर स्वाक्षरी करावी.
५. खालील नमूद सर्व कागदपत्रांचा संच तयार करावा, सुरुवातीच्या पानावर तुमचे पूर्ण नाव, संपर्क क्रमांक, " संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२६ आसन क्रमांक लिहावा. खाली दिलेल्या अनुक्रमानुसार सर्व कागदपत्रांची स्वयं:साक्षांकित संच तयार करावा:( एससीबीसी दाखला/नॉन क्रिमीलेयर २०२५-२६ साठी वैध असलेले असणे आवश्यक आहे.)

   i. चेकलिस्ट
   ii. स्वत:ची पुष्टी केलेला फॉर्म (किंवा फॉर्म दाखल केल्यानंतर तुम्हाला मिळणारा प्रतिसाद ईमेल)
   iii. जात प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/ एससीबीसी दाखला (कोणताही एक)
   iv. शाळा सोडल्याचा दाखला अनिवार्य (जातीचा उल्लेख आवश्यक) (फक्त कुणबी विद्यार्थ्यांसाठी)
   v. नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र व तहसीलदार यांच्या सहीने निर्गमित केलेला मागील तीन वर्षाचे (आर्थिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५, २०२५-२६ ) रु.आठ लाखापेक्षा कमी उत्पन्न दर्शविणारा मूळ उत्पन्न दाखला (कुणबी विद्यार्थ्यांसाठी नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र अनिवार्य आहे.) (कोणताही एक)
   vi. अधिवास प्रमाणपत्र
   vii. संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२६ प्रवेशपत्राची प्रत
   viii. संघ लोकसेवा आयोगाने जाहिर केलेल्या निकालावर ज्या पृष्ठावर विद्यार्थ्यांचा आसन क्र./नाव आहे, फक्त त्याच पृष्ठाची प्रत (आसन क्रमांक हायलाईट करावा).
   ix. आधार कार्ड
   x. अलीकडील काळातील एक पासपोर्ट आकाराचे रंगीत फोटो (चेकलिस्टमध्ये जोडा)
   xi. नाव/आडनावात कोणताही बदल असल्यास पुराव्यासाठी कोणताही कागदपत्र (विवाह प्रमाणपत्र/राजपत्र इ.)

xii. उमेदवार दिव्यांग असल्यास सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राची स्वयं:साक्षांकित प्रत

xiii. उमेदवार अनाथ असल्यास सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राची स्वयं:साक्षांकित प्रत

xiv. कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची एक स्पष्ट झेरॉक्स प्रत (बँक खाते आणि पासबुक उमेदवाराचे असणे आवश्यक आहे; नातेवाईक किंवा पालकांचे पासबुक कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही) तसेच व्यवहार करता यावा यासाठी खाते चालू असले पाहिजे. उमेदवारांच्या खात्याशी संबंधित समस्यांमुळे व्यवहारात कोणताही बिघाड झाल्यास, त्याची जबाबदारी सारथी संस्थेची राहणार नाही.

**उपरोक्त नमूद केलेल्या अनुक्रमानुसार सर्व कागदपत्रांची स्वयं:साक्षांकित प्रत तयार करुन त्याची हार्ड कॉपी खालील दिलेल्या पत्त्यावर विहित मुदतीत सादर करावी.**

**प्रति,**

**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), विभागीय कार्यालय अमरावती**

**पत्ता :** अमरावती विश्रामगृहालगत, कॅम्प रोड, चपराशीपुरा, जुनी भातकुली तहसिल अमरावती, ता. जि. अमरावती — ४४४६०२

**विषय :** सारथी- संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय अभियांत्रिकी वन सेवा मुख्य परीक्षा २०२६ प्रायोजकत्व

टीप :

- संकेतस्थळावर घोषित केलेल्या शेवटच्या तारखेच्या आत कागदपत्र पडताळणीसाठी ऑनलाईन फॉर्म आणि वरील कागदपत्रांच्या हार्ड कॉपी दाखल करावीत त्यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.
- उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करुनच अंतिम पात्र विद्यार्थी यादी घोषित करण्यात येईल व प्रायोजकत्वास पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनाच सदर प्रायोजकत्व रक्कम अदा करण्यात येईल.
- उमेदवारांनी सद्यस्थितीत चालू असलेलाच ईमेल आयडी आणि संपर्क क्रमांक ऑनलाईन अर्जामध्ये भरावा. संपर्क क्रमांक बंद असणे किंवा ईमेल प्राप्त न होणे किंवा सारथी कडून पाठविलेले ईमेल/मेसेजेस न वाचणे, यासाठी सारथी जबाबदार राहणार नाही.
- सारथी संस्थेकडून दिली जाणारी ही आर्थिक मदत फक्त **संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२६** प्रायोजकत्वासाठी लागू आहे.
- कागदपत्र पडताळणीसाठी स्वयं:साक्षांकित झेरॉक्स प्रतींच्या हार्ड कॉपी ऐवजी ईमेलवरून कोणत्याही सॉफ्ट कॉपी विचारात घेतल्या जाणार नाहीत, हार्ड कॉपीचा संच सादर करणे अनिवार्य आहे.
- दिलेल्या विहित मुदतीत सारथी कार्यालयास पोस्ट/कुरिअरद्वारे हार्ड कॉपी पाठवणे ही संपूर्णपणे उमेदवारांची जबाबदारी आहे.

<u>सूचना :</u>

१) फॉर्म व्यवस्थित वाचल्यानंतरच भरावा. फॉर्म भरताना अर्जदाराने /अपूर्ण माहिती या अर्जात भरल्यास अथवा माहिती लपवल्यास, कोणत्याही टप्प्यावर सदर विद्यार्थ्याची उमेदवारी सारथी, पुणे मार्फत रद्द करण्यात येईल व Sponsorship ची संपूर्ण रक्कम वसूल करण्यात येईल. एकच विद्यार्थ्याने वेगवेगळी माहिती भरून एकापेक्षा जास्त वेळा हा अर्ज भरल्यास विद्यार्थ्याची उमेदवारी सारथी, पुणे मार्फत रद्द करण्यात येईल.

२) सारथी मार्फत UPSC/MPSC/MES/JUDICAL SERVICES/ /IBPS/SSC इत्यादी प्रशिक्षण चालू असलेले अथवा प्रशिक्षणात निवड झालेले विद्यार्थी या प्रायोजकत्वास करिता पात्र नाही.

३) चालू आर्थिक वर्षात सारथी किंवा महाज्योती किंवा इतर तत्सम संस्थांमार्फत कोणत्याही स्वरुपाचा लाभ घेतला असल्यास उमेदवार सदर प्रायोजकत्वास पात्र राहणार नाही.जर विद्यार्थ्यांनी सदर माहिती लपवली व ते सिद्ध झाल्यास प्रायोजकत्वाच्या कोणत्याही पातळीवर संबंधित उमेदवारांकडून सारथी मार्फत दिलेल्या प्रायोजकत्वाची पूर्ण रक्कम वसूल करण्यात येईल.

४) सारथी संकेतस्थळावर प्रसिद्ध ऑनलाईन अर्ज, व्यवस्थित व विहित मुदतीत भरलेला असल्यास कागदपत्रे पडताळणीसाठी विचारात घेतला जाईल. केवळ ऑनलाईन अर्ज भरणे किंवा फक्त हार्ड कॉपी दाखल करणे विचारात घेतले जाणार नाही; ऑनलाईन अर्ज आणि हार्ड कॉपी दोन्ही दिलेल्या वेळेत दाखल करणे आवश्यक आहे. अर्जदाराने ऑनलाईन अर्ज भरणे आणि प्रायोजकत्वासाठी दिलेल्या वेळेत हार्ड कॉपी दाखल करणे अनिवार्य आहे. विहित मुदतीत न आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

५) उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये दिलेल्या ईमेल आणि संपर्क क्रमांकावरच सारथीद्वारे उमेदवाराशी आवश्यक असल्यास पुढील सर्व संपर्क केले जाईल, त्यामुळे उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये स्वत:चा सद्यस्थितीत कार्यरत असलेलाच ईमेल आयडी आणि मोबाइल नंबर प्रदान करणे आवश्यक आहे. संपर्क क्रमांक बंद असणे किंवा ईमेल प्राप्त न होणे, यासाठी सारथी संस्था जबाबदार राहणार नाही.

६) UPSC राजपत्रित तत्सम परीक्षेच्या इतर एकरकमी प्रायोजकत्वासाठी अर्ज भरला असल्यास उमेदवार या योजनेसाठी पात्र राहणार नाही (एका आर्थिक वर्षात एक लाभ)

७) बंद असलेले बँक खाते, चुकीचा बँक तपशील भरल्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

८) बँक खाते फक्त अर्जदाराच्या नावानेच असावे, नातेवाईक/पालक/मित्र यांचे बँक खाते तपशील दिल्याचे आढळल्यास, विद्यार्थ्याची उमेदवारी सारथी, पुणे मार्फत रद्द करण्यात येईल.

**ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख : दि.२२/४/२०२६**

प्रायोजकत्वाबद्दल कोणत्याही शंकासाठी divamravatisarthi@gmail.com ईमेल आय डी वर ई-मेल करावा.संपर्क :७२१२९९१६७२)

(महेश पाटील) (भा.प्र.से.)
व्यवस्थापकीय संचालक,
छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण
व मानव विकास संस्था (सारथी), पुणे